# पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे

**Pune metropolitan Region Development Authority, Pune**

नवीन प्रशासकीय इमारत, आकुर्डी रेल्वे स्टेशन जवळ, आकुर्डी, पुणे ४११०४४

PUNEMETROPOLIS New Administrative Building, Near Akurdi Railway Station, Akurdi, Pune 411044

Ph No. : 020- 259 33 344 / 356 / 333 / फोन. नं. ०२०- २५९ ३३ ३४४/ ३५६ / ३३३ Email:comm@pmrda.gov.in


## विकास परवानगी व प्रारंभ प्रमाणपत्र

## (मंजूर विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील नियम क्र. ६.६.१ नुसार)

जा.क्र.: बीएमयु/मौ.म्हाळुंगे-हिंजवडी-माण/स.नं.४० व इतर सेक्टर आर २३/प्र.क्र.१४२७/२१-२२ दि.०७/०३/२०२२

प्रति,

म्हाळुंगे लॅन्ड डेव्हलपर्स प्रा.लि.म्हाळुंगे टाऊनशिप डेव्हलपर्स एलएलपी
ॲशडॅन टाऊनशिप व्हेचंर्स प्रा.लि. व
माण – हिंजे टाऊनशिप डेव्हलपर्स एलएलपी तर्फे श्री. अतुल अशोक चोरडीया
रा. सॉलीटीयर वर्ल्ड, ८ मजला, स.न. ३६/१/१, रेजेनसी क्लासीक,
मुंबई बंगलोर महामार्ग, बाणेर, पुणे – ४५

मौजे- म्हाळुंगे तालुका- मुळशी, जिल्हा- पुणे येथील स.नं ४० व इतर, हिंजवडी स.न. १८७/३अपै व इतर, व माण स.नं. ४९/१ पै व इतर, तालुका- मुळशी, जिल्हा- पुणे येथील, एकूण क्षेत्र- ८४३६३५ चौ.मी. (हेक्टर -८४.३६३५) यामधील मंजूर एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्पातील सेक्टर आर - २३, क्षेत्र ३६२०५.०० चौ.मी. मध्ये रहिवास व वाणिज्य प्रकल्पामधील इमारत बांधकाम परवानगी प्रस्ताव मंजूरीस्तव प्राधिकरणाकडे प्राप्त झाला आहे.

आपण प्रस्तावासोबत सादर केलेल्या कागदपत्रास अधिन राहून तसेच सोबतच्या परिशिष्ट 'अ' मध्ये नमूद अटी व शर्तीस अधिन राहून उक्त प्रस्तावास विकास परवानगी व प्रारंभ प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

(मा. महानगर आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मान्यतेने)

महानगर आयुक्त
तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी
पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,
पुणे यांचे करिता

Pune Metropolitan Regional Development Authority, Pune PMRDA

मौजे- म्हाळुंगे तालुका- मुळशी, जिल्हा- पुणे येथील स.नं ४० व इतर, हिंजवडी स.न. १८७/३अपै व इतर, व माण स.नं. ४९/१ पै व इतर, तालुका- मुळशी, जिल्हा- पुणे येथील, एकूण क्षेत्र- ८४३६३५ चौ.मी. (हेक्टर -८४.३६३५) यामधील मंजूर एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्पातील सेक्टर आर - २३, क्षेत्र ३६२०५.०० चौ.मी. मध्ये रहिवास व वाणिज्य प्रकल्पामधील इमारत बांधकाम परवानगी प्रस्ताव

---

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे यांचेकडील दि- ०७/०३/२०२२ रोजीचे पत्र क्र. १४२७/२१-२२ सोबतचे परिशिष्ट 'अ'

१) मंजूर नकाशाप्रमाणेच जागेचा विकास व बांधकाम करणे बंधनकारक राहील.

२) सदर विकास परवानगी व प्रारंभ प्रमाणपत्र दिल्यानंतर एक वर्षाच्या कालावधीपर्यंत बांधकाम सुरु करणे बंधनकारक राहील. बांधकाम सुरु केल्याबाबत प्राधिकरणाला त्याप्रमाणे कळविणेत यावे. तदनंतर त्यापुढे आवश्यकतेनुसार विहीत मुदतीमध्ये सदर परवानगी व प्रमाणपत्राचे नुतनीकरण करुन न घेतल्यास सदरचे परवानगी व प्रमाणपत्र संपुष्टात येईल.

३) जिल्हाधिकारी पुणे यांनी आदेश क्र. पीआरएच/टीएस/१३/२०१४, दि.१९/०६/२०१४ अन्वये दिलेल्या परवानगी मधील सर्व अटी / शर्ती अर्जदार कंपनीवर बंधनकारक राहतील.

४) एकात्मीकृत नगर वसाहत विकसीत करणेकामी शासन अधिसुचना क्र. टीपीएस-१८१६/प्र.क्र.३६८(भाग-१)/१५/१७/३७(१क क)/वियो/नवि-१३, दि. ०८/०३/२०१९ चे विनीमय व त्यामध्ये सुधारित करण्यात येणाऱ्या सर्व नियमांचे तसेच शासनाकडून / जिल्हाधिकारी कार्यालयाकडून येणाऱ्या सर्व सुचनांचे पालन करणे अर्जदार कंपनीवर बंधनकारक राहील.

५) शासनाच्या नगर विकास विभागाकडील दि. २९/०६/२०१९ क्र. क्र. टिपीएस-१८१४/४८४-१२/पु.बा.क्र.१३०/१४/प्र.क्र.३४८/१४/नवि-१३ अन्वये Locational Clearance मधील अटींचे / सुचनांचे पालण करणे अर्जदार कंपनीवर बंधनकारक राहील.

६) विशेष प्रंसगी महानगर आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे यांनी लेखी आदेश दिले तर ते कंपनीवर बंधनकारक राहतील. त्यास सदर परवानगी वरून बाधा येणार नाही.

७) नगर वसाहतीच्या नियमावलीतील अनुज्ञेय असलेल्या एकूण चटई क्षेत्र निर्देशांकाच्या मर्यादेत संपूर्ण टाऊनशिप चे बांधकाम करणे अर्जदार कंपनीवर बंधनकारक राहील.

८) प्रकल्पाबाबत कोणतीही जाहीरात करतेवेळी जाहिरातीमध्ये मंजूर विकास परवानगी प्रमाणे तपशील व नकाशे इत्यादीचा समावेश करणे अर्जदार कंपनीवर बंधनकारक राहील.

९) प्रस्तावासोबत मोजणी दि. १०/०३/२०१०, मो.र.नं. १७८/१० ने केलेल्या वहीवाटीचे मोजणी नकाशातील हद्दीचे तसेच जागेच्या मालकी / वहिवाटीबाबत अर्जदाराने /विकासकाने/ जमीनमालकाने याबाबत सादर केलेल्या प्रतिज्ञापत्राचे अधिन राहून परवानगी देण्यात येत आहे. सदर जमिनीचे वहीवाटीचे हद्दीचे अनुषंगाने अथवा इमारतीबाबत कोणतेही व्यक्तिगत वाद/ न्यायालयीन वाद उद्भवल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी अर्जदार /

Pune Metropolitan Regional Development Authority ★ Pune
PMRDA

विकासक / जमिनमालक यांची राहील. ज्या जागेची मालकी / वहिवाट, अर्जदार /विकासक / जमिनमालक यांची नाही अशा कोणत्याही जमिनीवर सदर परवानगीव्दारे विकास अनुज्ञेय राहणार नाही.

१०) प्रस्तुतच्या जमिनीवर आर्थिक संस्थाचा बोजा असल्यास त्यास अर्जदार / जमीनमालक /विकासक सर्वस्वी जबाबदार राहतील.

११) नागरी जमीन (कमाल धारणा व विनियम) अधिनियम,१९७६ हा निरसित झाला असल्याने या अधिनियमांतर्गत बाबींकरिता प्रस्तावासोबत आपण रु. ५००/- च्या स्टॅम्प पेपरवरील दिनांक – २०/१०/२०२० रोजी नोटरी श्री. **सतिशचंद्रा एल. पिटले** यांचेसमोर केलेले विहीत नमुन्यातील शपथपत्र व बंधपत्र क्र. १९७/३३/२०२० सादर केलेले आहे. सदर शपथपत्र व बंधपत्रास अधिन राहून सदर बांधकाम परवानगी देण्यात येत आहे. त्याबाबतची संपूर्ण जबाबदारी अर्जदार /जमीनमालक /विकासक यांची राहील सदर शपथपत्र व बंधपत्रातील माहिती चुकीची अथवा दिशाभूल करणारी आढळून आल्यास झालेले बांधकाम अनधिकृत समजून कारवाईस पात्र राहील.

१२) विषयांकित जमिनीवर कोणतेही विकास कार्य सुरु करण्यापूर्वी रेखांकन जागेवर सिमांकित करुन भूमि अभिलेख खात्याकडून प्रमाणित करुन घेणे बंधनकारक आहे. मंजूर रेखांकनानुसार जागेवरील सिमांकन झाल्यानंतर, भूखंडाचे क्षेत्रफळ, रस्त्याची रुंदी मंजूर रेखांकनात दर्शविल्यापेक्षा कमी भरता कामा नये. यामध्ये कोणताही बदल झाल्यास रेखांकन पुन्हा मंजूर करुन घेणे बंधनकारक राहील. अशा प्रमाणित रेखांकनाची प्रत प्राधिकरणास सादर करुन त्यास अंतिम मंजूरी घेतल्याशिवाय कोणताही विकास करता येणार नाही.

१३) मंजूर नकाशात दर्शविलेप्रमाणे नियोजित बांधकामापासुन पुढील, मागील व बाजुची सामासिक अंतरे प्रत्यक्षात जागेवर कायम व खुली ठेवणे आवश्यक राहील.

१४) रेखांकनातील भूखंड व नियोजित इमारतीचा वापर फक्त मंजूर नकाशानुसार रहिवास व वाणिज्य याप्रमाणे अनुज्ञेय केलेल्या वापरासाठी करणे बंधनकारक राहील. इमारतीच्या वापरात बदल करावयाचा असल्यास त्यास प्राधिकरणाची पूर्वमंजूरी घ्यावी लागेल.

१५) इमारतीचे जोता तपासणीसाठी अर्ज करताना अकृषिक परवानगी आणि परवानाधारक, वास्तुविशारद/ अभियंता /स्ट्रक्चरल अभियंता/ सुपरवायझर यांचे प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील, त्याचप्रमाणे अंतिम भोगवटा प्रमाणपत्रासाठी अर्ज करताना बांधकाम प्रस्तावांतर्गत जमिनीचे महसूल /भूमी अभिलेखात एकत्रिकरण /उपविभागणी केलेला अद्यावत ७/१२ उतारा /प्रॉपर्टी कार्ड व मोजणी नकाशा सादर करणे बंधनकारक राहील.

१६) इमारतीचे मंजूर नकाशानुसार जोत्यापर्यंतचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर जोते तपासणी प्रमाणपत्र प्राप्त करुन न घेता पुढील बांधकाम केल्यास सदरचे बांधकाम अनधिकृत समजण्यात येऊन असे बांधकाम दंडात्मक कार्यवाहीस पात्र राहील.

१७) अभिन्यासातील रस्ते, व खुली जागा यांची देखभाल व अभिन्यासामध्ये दर्शविलेले बृहत आराखडा / वर्गीकृत /प्रादेशिक योजना रस्ते/ रस्ता रुंदीकरणातील क्षेत्र सर्व जनतेच्या वापरासाठी तसेच शेजारच्या जमीनमालकास वापरण्यास खुले ठेवणे बंधनकारक राहील.बृहत आरखड्यातील सर्व अटी / शर्ती यांचे पालन करणे अर्जदार / विकासक / जमिनमालक यांचेवर बंधनकारक राहील.

Pune Metropolitan Regional Development Authority
PMRDA